ठाणे, सोमवार दि. ८ जुलै २०२४ वर्ष : १३, अंक : ७१ , पाने : ४, किंमत : २ रुपये Maharashtra Samrat Maharashtra Samrat dainikmahasamrat@gmail.com Reg. No. THC/58/2024-2026


# दैनिक महाराष्ट्र सम्राट

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच!®

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर, पुणे संपादक : चंद्रकांत भोईटे


अग्रलेख

**वरळीतील दुर्दैवी अपघात**

पुण्यात हिट अँड रनचा प्रकार घडला तसाच मुंबईतील वारली येथे घडला आहे. मुंबईतल्या वरळी हीट अँड रन प्रकरणात नवी माहिती समोर येत आहे. बीएमडब्ल्यू या आलिशान कारनेमासे विक्रेत्या दाम्पत्याला ठोकर दिली आहे. .....पान २ वर



भातावर एक चमचा तूप घालून खाणे योग्य की अयोग्य?

...पान ३ वर


ई-पेपरसाठी नियमित पहा...

ePaper PDF

www.maharashtrasamrat.com


**तापमान**

| कमाल | किमान |
|---|---|
| ३६° से | २९° से |

**बाजार**

| सोने | चांदी |
|---|---|
| ७३,२८० | ९३,६८० |

**डोकं खाजवा** –अशोक सुतार




दुधाचे दर वाढवणार म्हणतोस ? माझा चारा कधी वाढवणार आहेस?...

# ठाणे जिल्ह्यात मुसळधार

## मुरबाड-वाशिंद रस्त्यावरील पूल पाण्याखाली

## 18 गावांचा संपर्क तुटला

**ठाणे – शनिवारपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसाने कल्याण, डोंबिवली, ठाणे पनवेल, शहापूर, मुरबाडमध्ये पडणाऱ्या पावसाने जोर धरला आहे. मुरबाडहुन वाशिंदकडे जाणारा पुल पाण्याखाली गेला आहे. त्यामुळं शहापूर तालुका तसंच मुरबाड तालुक्यातील सुमारे १८ गाव–पाड्यांचा संपर्क तुटला आहे. गावाकडून शहरांकडं जाणाऱ्या नागरिकांसह दूध, भाजी विक्रेते अडकून पडले आहेत. (पान २ वर)**



### पनवेलमधील पडघे गावाला पुराचा वेढा

पनवेलमधील पडघे गावाला पुराचा वेढा पडला आहे. पडघे गावाजवळून वाहणाऱ्या कासाडी नदीला पूर आल्याने नागरिकांची चांगलीच तारांबळ उडाली आहे. इतकंच नाहीतर पूराच्या पाण्यात अनेक गाड्या वाहून गेल्या आहेत. पनवेल परिसरात अजूनही मुसळधार पाऊस कोसळतोय. कासाडी नदीचं पाणी पनवेल शहरात अनेकांच्या घरात शिरल्याने सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. दरम्यान, पनवेलमधील पडघे गावात तुफान पाऊस झाल्याने एक किलोमीटर परिसरात पावसाचं गुडघाभर पाणी साचलं आहे.

### उल्हास खोऱ्यातील मुसळधार पावसामुळे उल्हास, भातसा, भारंगी, काळू नद्यांच्या पाणी पातळीत वाढ

कल्याण : रायगड जिल्ह्यातील कर्जत परिसरातील उल्हास खोरे आणि ठाणे जिल्ह्यातील सह्याद्री डोंगरांच्या रांगेत रात्रभर कोसळलेल्या मुसळधार पावसामुळे या खोऱ्यातून वाहणाऱ्या उल्हास, भातसा, काळू, भारंगी नद्यांच्या पाणी पातळीत रविवारी रात्री पासून वाढ झाली आहे.

### आपत्ती व्यवस्थापनाचा आराखडा तयार :

गेल्या तीन दिवसांपासून ठाणे जिल्ह्यात पावसानं दमदार हजेरी लावली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाकडून आपत्ती व्यवस्थापन विभागाला सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या आहेत. तसंच ठाणे जिल्हाधिकारी कार्यलयाकडून स्थानिक यंत्रणांना भुस्खलन होऊ शकणाऱ्या गावांची, क्षेत्रांची पाहणी करून आराखडा तयार करण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत. तसंच पाणी पातळीची माहिती जनतेला देण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या आहेत.

### अनेक गाव–पाड्यांचा संपर्क तुटला :

पुराच्या पाण्यामुळं शिरगाव, चिखले, झापवाडी, मुरबाड तालुक्यातील गावांना फटका बसला आहे. शिवाय शहापूर तालुक्यातील शेरा, अंबरचा मड, मासवणे, बावघर, भय गावांचा संपर्क तुटला आहे. या गावाच्या आसपास असलेल्या अनेक गावपाड्यांसह टिटवाळा, वाशिंद, मुरबाड, शहापूर शहराचा संर्पक तुटला आहे.

# ट्रॅकवर झाड कोसळल्याने मध्य रेल्वेची सेवा साडेपाच तास विस्कळीत

## स्टेशनवर प्रवाशांची मोठी गर्दी

मध्य रेल्वेची कसारा सीएसएमटी सेवा विस्कळीत झाली आहे. वाशिद, खडवली, आटगाव दरम्यान माती वाहून गेल्याने पोल वाकला. त्यामुळे ओव्हरहेड वायरवर परिणाम झाल्याचे पाहायला मिळत आहे. तर दुसरीकडे स्टेशनच्या पुढे असेल्या ट्रकवर झाड कोसळले. त्यामुळे रेल्वे सेवा विस्कळीत झाली. टिटवाळा ते कसारा दरम्यान डाऊन मार्ग पूर्णपणे ठप्प झाली होती. पावसामुळे रेल्वे विस्कळीत झाल्याने मेगाब्लॉक रद्द करण्यात आला. रेल्वे सेवा विस्कळीत झाल्याने कल्याण, शहाड, आंबिवली, टिटवाळापासून कसारापर्यंत प्रवाशांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. तसेच आटगाव ते वाशिंद रेल्वे स्थानकाजवळ ओव्हरहेड वायरवर झाड पडलं आहे. यामुळे ठाणे ते कसारा आणि कसारा ते ठाणे या ठिकाणी जाणारी वाहतूक विस्कळीत झाली आहे. सध्या रेल्वे प्रशासनाकडून ओव्हरहेड वायरवर पडलेले झाड काढण्याचे काम युद्ध पातळीवर सुरु आहे. मात्र या घटनेचा मुबंई कल्याण मार्गावर परिणाम झाला नसून ही वाहतूक सुरळीत सुरू होती.



## कळंबोलीत पुराचे पाणी रेल्वे रुळावर

तर दुसरीकडे नवी मुंबईतील कळंबोली येथे मुसळधार पावसामुळे रेल्वेच्या ट्रॅकवर पाणी आल्याचे पाहायला मिळत आहे. कोकणातून येणाऱ्या अनेक गाड्या अडकल्याचे चित्र दिसत आहे. मँगलोर एक्सप्रेस ही गाडी कळंबोली या ठिकाणी अडकली आहे. त्यामुळे अनेक प्रवाशी हे गाडीतून उतरुन जाताना दिसत होते. त्याचप्रमाणे इतर एक्सप्रेस रद्द करण्यात आल्या.

# पुढील ३ दिवस राज्यात पावसाचा जोर कायम राहणार

मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्रात पावसाचा जोर अधिक राहणार असल्याचे डख म्हणाले. राज्यात ४ ते ११ जुलैपर्यंत पाऊस पडणार असल्याचा अंदाज आपण वर्तवला होता असे डख म्हणाले. दरवर्षी १० ते १५ जुलैपर्यंत राज्यात चांगला पाऊस होत असतो. यावर्षी जुलै महिन्यात खूप चांगला पाऊस पडणार असल्याचे डख म्हणाले.

### हवामान अभ्यासक पंजाबराव डख यांचा अंदाज...

यावर्षी जुलै महिन्यात दोन लो प्रेशर येणार आहेत, त्यामुळं चांगला पाऊस पडणार आहे. राज्यात १३ जुलैपासून २५ जुलैपर्यंत दोन कमी दाबाचे पट्टे तयार होणार आहेत. त्यामुळं चांगला पाऊस पडणार आहे.

### नदी नाले ओढू भरुन वाहणार

बऱ्याच ठिकाणी सोयाबीनची पाने पिवळी पडत आहेत. अशा ठिकाणी शेतकऱ्यांनी फवारणी करावी असे पंजाबराव डख म्हणाले. एकदम राज्यातील पाऊस कमी होणार नाही. भाग बदलत पाऊस पडत राहणार असल्याची माहिती पंजाबराव डखांनी दिली आहे. मात्र, ७, ८ आणि ९ जुलैला राज्यात मुसळधार पाऊस पडून नदी नाले ओढू भरुन वाहणार असल्याचे पंजाबराव डख म्हणाले.

**थोडक्यात घडामोडी**

### पंतप्रधान सौरऊर्जा योजनेस भरभरून प्रतिसाद, मात्र अंमलबजावणीत मंदगती, केंद्रराज्य यंत्रणेत समन्वयाचा अभाव

मुंबई : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जाहीर केलेल्या छतावरील सौरऊर्जा (रूफटॉप सोलर) योजनेस जनतेचा भरभरून प्रतिसाद मिळत असून एक कोटीहून अधिक लोकांनी अर्ज केले आहेत. मात्र पहिल्या तीन–चार महिन्यांमध्ये केवळ १६ हजारांहून अधिक रूफटॉप सोलर यंत्रणा कार्यान्वित झाल्या आहेत. केंद्र व राज्य सरकारी यंत्रणांमधील समन्वयाअभावी अंमलबजावणीची मंदगती असल्याचे सूत्रांनी सांगितले. अयोध्येतील श्रीराम मंदिराचा लोकार्पण सोहळा झाल्यानंतर पंतप्रधान मोदी यांनी या योजनेची घोषणा केली होती. दरमहा ३०० युनिटपर्यंत या योजनेत मोफत वीज ग्राहकांना मिळू शकणार आहे. या यंत्रणेसाठी प्रति किलोवॅट सुमारे ६० हजार रुपये खर्च असून एक किलोवॅट संचासाठी ३० हजार रुपये, दोनसाठी ६० हजार रुपये आणि तीन किलोवॅटसाठी ७८ हजार रुपये इतके अनुदान केंद्र सरकार देणार आहे. या योजनेसाठी स्वतंत्र संकेतस्थळ विकसित करण्यात आले असून त्यावर एक कोटीहून अधिक ग्राहकांनी नोंदणी केली. त्यापैकी ५०–५५ लाख अर्ज स्वीकृत झाले आहेत.

### तानसा नदीची पातळी वाढल्याने शेतीकामासाठी गेलेले नागरिक अडकले

(सविस्तर वृत्त पान ४)

# कोपरीतील रहिवाशांसाठी उभारले अद्यावत शौचालय



ठाणे – कोपरी शांती नगर परिसरात सार्वजनिक शौचालयाची चांगली व्यवस्था नसल्यामुळे नागरिकांची गैरसोय होत होती. परंतु मा.नगरसेविका मालती रमाकांत पाटील यांच्या प्रयत्नांनी ठाणे महापालिकेने सुसज्य सार्वजनिक शौचालय बांधून दिले आहे. या शौचालयात भारतीय अणि इंग्रजी अशी दोन्ही सुविधा देण्यात आल्या आहेत.

शांती नगर परिसरात शौचालयाची चांगली सोय नसल्यामुळे या ठिकाणी चांगले शौचालय बांधण्याची मागणी जोर धरत होती. दरम्यान काही महिन्यांपूर्वी महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री मा. एकनाथ शिंदे व नवनिर्वाचित खासदार नरेश म्हस्के यांना मा. नगरसेविका मालती रमाकांत पाटील अणि रमाकांत (दादा) पाटील यांनी शौचालयाची बाब निदर्शनास आणली. शिंदे साहेबांनी देखील याची दखल घेऊन तात्काळ सदर कामाची अंमलबजावणी करण्याची सूचना केली. त्यानुसार याठिकाणी अद्यावत शौचालय उभे राहिले आहे. महिला, ज्येष्ठ नागरिक, लहान मुले यांच्यासाठी वेगवेगळी सोय शौचालयात असल्याची माहिती रमाकांत (दादा) पाटील यांनी दिली. या प्रसंगी विभाग प्रमुख प्रशांत पाटील, उपविभाग प्रमुख जमीर सय्यद, उपविभाग प्रमुख गणेश मुदलीयर, उपविभाग प्रमुख संतोष सकट, उपविभाग प्रमुख राजेंद्र सोनी, उपविभाग प्रमुख हेमंत राऊत, शाखाप्रमुख मनीष साळवे, शाखाप्रमुख तेजस दळवी, शाखाप्रमुख गणेश मालुसरे, कोपरी पाचपांखाडी युवासेना विधानसभा समन्वयक मयूर ठाकूर, शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष समन्वयक अवधूत कदम, (पान २ वर)

**मा.नगरसेविका मालती रमाकांत पाटील यांच्या प्रयत्नांना यश**



ठाणे शहराचे आमदार संजय केळकर यांच्या वाढदिवसानिमित्त विभागातील ज्येष्ठ नागरिकांना मोफत छत्री तसेच साखर वाटप आमदार संजय केळकर यांच्या हस्ते करण्यात आले. भाजपा ठाणे शहर उपाध्यक्ष व स्वामी फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष महेश कदम यांच्या वतीने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. (छाया – मनोज सिंह)

# नवी मुंबई पोलीस भरती : लेखी परीक्षा सुरळीत पार

नवी मुंबई : नवी मुंबई पोलीस भरतीतील दुसरा महत्वाचा टप्पा असलेली लेखी आज (ता. ७) पार पडली. पावसाचा अंदाज बघता सुटसुटीत असणारे परीक्षा केंद्र म्हणून वाशीतील सिडको प्रदर्शनी केंद्रात सादर परीक्षा पार पडली. पोलीस शिपाई संवर्गातील १८५ पदांसाठीची सदर परीक्षा घेण्यात आली.

नवी मुंबई पोलीस विभागातील शिपाई संवर्गातील १८५ पदांची परीक्षा आज पार पडली असून सदर परीक्षेसाठी १ हजार ३९९ पुरुष तर ४४३ महिला परीक्षार्थी होत्या. मात्र त्यात १० पुरुष आणि २ महिला गैर हजर राहिल्या उर्वरित १ हजार ३८९ पुरुष आणि ४४१ महिलांनी सदर परीक्षा दिली. हि परीक्षा सिडको प्रदर्शनी केंद्रात १० ते साडे अकरा दरम्यान झाली असली तरी प्रत्यक्षात सकाळी ७ वाजता उपस्थित राहण्याचे निर्देश परीक्षार्थी विद्यार्थ्यांना देण्यात आले होते. त्यामुळे सकाळी साडे सहा पासूनच परीक्षा केंद्र परिसरात विद्यार्थी दिसून येत होते.

२७ जूनला मैदानी परीक्षा संपल्यानंतर ५ हजार ९८४ मधून १ हजार ८४२ पात्र उमेदवार लेखी परीक्षेसाठी निवडण्यात आले. यामध्ये १३९९ पुरुष आणि ४४३ महिलांचा समावेश होता. मैदानी चाचणी प्रमाणे लेखी परीक्षेवेळी उमेदवारांसाठी मोफत अल्पोपहाराची, खाद्यगृह स्टॉल पोलीस विभाग आणि सेवा भावी संस्थांकडून उभारले गेले होते. त्यामुळे सकाळी सात वाजता हजर झालेल्या परीक्षार्थींनी परीक्षेपूर्वी पोटपूजा केली. नवी मुंबई पोलीस आयुक्तालय क्षेत्राबाहेरील येणाऱ्या उमेदवारांना रविवारी परिक्षा केंद्रावर पोहचण्यासाठी पनवेल, मानसरोवर आणि वाशी रेल्वे स्थानकातून शासकीय वाहनांची सोय नवी मुंबई पोलीसांनी केली होती. परीक्षा पारदर्शक होण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेरा अशा आधुनिक साधनांची मदत घेण्यात आली होती. अशी माहिती जनसंपर्क अधिकारी, सहाय्यक पोलीस आयुक्त अजयकुमार लांडगे यांनी दिली.

**१२ परीक्षार्थी गैरहजर, १ हजार ८३० जणांनी दिली परीक्षा**

# हेल्थकॉन हाफ मॅरेथॉनव्दारे डॉक्टरांनी प्रसारित केला 'सफाई अपनाओ, बिमारी भगाओ'चा आरोग्यपूर्ण संदेश

नवी मुंबई – स्वच्छ भारत मिशनच्या वतीने जाहीर करण्यात आलेल्या 'सफाई अपनाओ, बिमारी भगाओ' अभियानास जागतिक डॉक्टर्स दिनाचे औचित्य साधून १ जुलैपासून प्रारंभ करण्यात आला असून नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या नियंत्रणाखाली स्वच्छता आणि आरोग्य विषयक विविध उपक्रम राबविले जात आहेत. अशाच प्रकारचा हाफ मॅरेथॉनचा अभिनव उपक्रम 'हेल्थकॉम' या वैद्यकीय क्षेत्रात काम करणाऱ्या डॉक्टरांच्या संघटनेच्या माध्यमातून, लेट्स सेलिब्रेट फिटनेस या संस्थेच्या सहयोगाने, नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने नेरूळ जिमखाना ते नमुंमपा मुख्यालय ते परत नेरूळ जिमखाना अशा स्वरूपात राबविण्यात आला. महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी झेंडा दाखवून या 'हेल्थकॉम हाफ मॅरेथॉन'चा शुभारंभ केला.




यावेळी आयुक्तांसमवेत अतिरिक्त आयुक्त श्री. सुनिल पवार, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. प्रशांत जवादे, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ. अजय गडदे, परिवहन उपक्रमाचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी श्री. तुषार दौंडकर, क्रीडा विभागाच्या प्र. उपआयुक्त श्रीम.अभिलाषा म्हात्रे, सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी श्री. शशिकांत तांडेल व डॉ. अमोल पालवे, कार्यकारी अभियंता श्री. राजेश पवार तसेच हेल्थकॉन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. राम, लेट सेलिब्रेट फिटनेस संस्थेच्या प्रमुख श्रीम.रिचा समित, नेरुळ जिमखाना अध्यक्ष श्री.शशी पांडे आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

केंद्र व राज्य सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार 'सफाई अपनाओ, बिमारी भागाओ' अभियान स्वच्छतेप्रमाणेच आरोग्य विभागाशी निगडीत आहे. विशेषत्वाने पावसाळी कालावधीत उद्भवणारे जलजन्य आणि किटकजन्य आजार उद्भवूच नयेत यादृष्टीने(पान २ वर)




# संपादकीय...



संपादक-चंद्रकांत भोईटे

## वरळीतील दुर्दैवी अपघात

पुण्यात हिट अँड रनचा प्रकार घडला तसाच मुंबईतील वारली येथे घडला आहे. मुंबईतल्या वरळी हीट अँड रन प्रकरणात नवी माहिती समोर येत आहे. बीएमडब्ल्यू या आलिशान कारनेमासे विक्रेत्या दाम्पत्याला ठोकर दिली आहे. या अपघातात महिलेला चिरडले असून तिला काही अंतर गाडीने फटाफटन नेले आहे. या घटनेतील त्या दुर्दैवी महिलेचा मृत्यू झाला. या कारमध्ये शिवसेना शिंदे गटाचे उपनेते राजेश शाह यांचा मुलगा मिहीर शाह होता असा आरोप मृत महिलेच्या पटीने केला आहे. बीएमडब्ल्यू चालकाने प्रदीप नाखवा आणि त्यांच्या पत्नी कावेरी नाखवा यांना चिरडले आणि फरपटत नेले. या अपघातात प्रदीप नाखवा बाजूला पडले. यानंतर प्रदीप नाखवा यांनी या अपघाताची गंभीर दखल घ्यावी अशी मागणी केली आहे. आक्रोशही समोर आला आहे. या घटनेबाबत पोलीस तपास करीत असले तरी गुन्हेगाराला पाठीशी घालण्याचा प्रकार होऊ नये,असे वाटते. मुंबईतील वरळी येथील हीट अँड रन प्रकरणातील आरोपी मिहीर शाह रात्री जुहू येथील बारमध्ये मद्यप्राशन करत होता. त्यानंतर तो गोरेगावला गेला. घरी गेल्यानंतर त्याने त्याच्या चालकाला सांगितले की, आपल्याला लाँग ड्राईव्हवर जायचे आहे. प्रवासादरम्यान तो मुंबईतल्या वरळी भागात आला. त्यानंतर पुन्हा गोरेगावला जायला निघाला. गोरेगावला जाताना मिहीर शाह स्वतः कार चालवत होता असा आरोप प्रत्यक्षदर्शींनी केला आहे. तसेच जो अपघात झाला तो एट्रिया मॉलजवळ झाला. तिथपासून त्याने कावेरी नाखवा यांना फरपटत नेले. विशेष म्हणजे हा अपघात झाला तेव्हा मिहीरने मद्यप्राशन केले होते. पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत. वरळीमध्ये आज पहाटे हिट अँड रन प्रकारामुळे मुंबई हादरली आहे. दुचाकीवरून जाणाऱ्या मासे विक्रेता दाम्पत्याला एका बीएमडब्लू वाहनाने धडक दिली. हे वाहन शिवसेना शिंदे गटाचे नेते राजेश शाह यांचा मुलगा मिहिर शाह चालवत असल्याचा आरोप अपघातामधून बचावलेल्या नाखवा यांनी केला आहे.ज्यावेळी अपघात झाला, त्यावेळी मिहीर शाह याच्यासह त्याचा चालक होता. वरळीतील नेहरू तारांगण येथील बस स्टॉपच्या समोरच्या बाजूने जात असताना पहाटे हा अपघात झाला. मिहीरचा फोन सध्या बंद आहे. अपघात झाल्यानंतर बीएमडब्लू वाहनावरील पक्षाचे नाव आणि चिन्हाचे स्टिकर कुणीतरी काढले, असा आरोप करत नाखवा यांनी राजकारण्यांवर जोरदार आसूड ओढले आहेत. मिहीर शाहने अपघाताच्या स्थळावरून पळ काढला. त्यानंतर त्याने आपला मोबाइल बंद करून ठेवला आहे. मिहीर शाह सध्या फरार आहे. तर पोलिसांनी शाह गर्लफ्रेंडला ताब्यात घेतले आहे. मिहीर शाह त्याच्या गर्लफ्रेंडला भेटला होता अशी माहिती समोर येत आहे. अपघातानंतर गाडीवर असलेल्या पक्षाचे चिन्ह खोडून काढण्याचाही प्रयत्न झाला. या प्रकरणावर मनसेचे नेते संदीप देशपांडे यांनी प्रतिक्रिया दिली आहे की, अपघाताचा हा घृणास्पद प्रकार आहे. वेळीच ब्रेक मारला असता तर त्या महिलेचा जीव वाचला असता. अपघात प्रकरणी राजकीय पक्षाचे लोक एकमेकांवर टीका करत आहेत. पण मागून हे आरोपींनाच पाठिंबा देतात. आम्हाला कोण वाचवणार? असा उद्विग्न प्रश्न पीडित प्रदीप नाखवा यांनी विचारला आहे. आरोपी मिहिर शाह अपघातानंतर फरार आहे. तर शाह यांचा चालक वाहन चालवत असल्याचे राजेश शाह यांनी म्हटले आहे. ही हाय प्रोफाइल केस असल्याने या प्रकरणावरून आता राजकारणही पेटले आहे. अपघातातील बीएमडब्लू वाहनाने नाखवा दाम्पत्याच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. धडक बसताच दाम्पत्य गाडीच्या बोनेटवर पडले. चालकाने ब्रेक मारताच दाम्पत्य खाली पडले. प्रदीप नाखवा बाजूला पडले, पण दुर्दैवाने त्यांची पत्नी चाकाखाली आली. तेवढ्यात बीएमडब्लूच्या चालकाने तशीच गाडी पुढे नेल्यामुळे महिलेचं मृत्यू झाला, अशी माहिती प्रत्यक्षदर्शींनी दिली आहे. अपघात झाल्यानंतर बीएमडब्लू गाडीवरील पक्षाचे नाव, चिन्ह असलेले स्टिकर काढून टाकण्यात आले आहे, असा आरोपही नाखवा यांनी केला. नाखवा यांनी आरोप केलेल्या मिहिर शाहने मध्यरात्रीपर्यंत जुहू येथील बारमध्ये मद्यप्राशन केल्याची माहिती मिळत आहे. सदर पार्टीची पोस्ट मिहिरने त्याच्या इन्स्टाग्रामवर टाकली होती. पोलिसांनी जुहूमधील त्या बारमध्येही चौकशी केली असून त्या ठिकाणचे सीसीटीव्ही फुटेज गोळा केले आहे. मिहिरने मद्यप्राशन केले होते का? अपघातावेळी बीएमडब्लू वाहन नेमके कोण चालवत होते? याचा तपास आता पोलिसांकडून केला जात आहे. शिवसेना ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांनी वरळी पोलीस ठाण्यात जाऊन घटनेची माहिती घेतल्यानंतर माध्यमांशी संवाध साधला. त्यांनी म्हटले आहे की, वरळी हिट अँड रनच्या घटनेतील आरोपी चालक फरार आहे. वरिष्ठ पोलीस अधिकारी तपास करत आहेत. सीसीटीव्ही फुटेजही जप्त करण्यात आले आहे. या घटनेतील जो तरुण आरोपी आहे, त्याला लवकरात लवकर पकडून कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी आदित्य ठाकरेंनी केली आहे. सध्या हिट अँड रनच्या घटना अनेक शहरांत वाढत आहेत. पुण्यातील घटनेत तर हे प्रकरण मॅनेज करण्यापर्यंत गुन्हेगारांची मजल गेली होती. तसेच आता या घटनेत होऊ नये ही अपेक्षा !

### जाहीर नोटीस

आमचे अशीला अमर टॉवर को ऑपरेटिव हाउसिंग सोसायटी, भास्कर कॉलनी, नौपाडा, ठाणे पश्चिम यांचे वतीने तमाम जनतेला कळवू इच्छितात की सदनिका क्रमांक ऋ-१, तळमजला, अमर टॉवर, भास्कर कॉलनी, नौपाडा, ठाणे पश्चिम ४००६०२ क्षेत्रफळ अंदाजे स्केअर फुट (बिल्टअप), या सदनिकेच्या अनुषंगाने वितरित केलेला भागप्रमाणपत्र क्रमांक १, व भाग क्रमांक १ ते ५ (दोन्ही क्रमांक धरून) हे संस्थेच्या दप्तराप्रमाणे श्री गणेश कृष्णजीवनगे यांचे नावे होती (यापुढे सदर सदनिका असा उल्लेख आल्यास व वेगळा उल्लेख नसल्यास सदर सदनिका व सदर भागप्रमाणपत्र समजावे) श्री गणेश कृष्णाजी वनगे यांचे दिनांक १०/५/२०२१ रोजी निधन झाले व तसेच त्यांच्या पत्नीचे म्हणजे सौ गौरी गणेश वनगे यांचे १७/१५/२०२१ रोजी निधन झाले त्यानंतर त्यांच्या वारसांनी म्हणजेच श्री कन्हाय गणेश वनगे व श्री मोहित गणेश वनगे सदर सदनिका त्यांच्या नावे करण्यासाठी आमच्या अशिलांकडे अर्ज केला व आवश्यक ती कागदपत्रे देखील संस्थेकडे सादर केली होती तसेच त्यांनी त्यांच्या व्यतिरिक्त श्री गणेश कृष्णाजी वनगे आणि सौ गौरी गणेश वनगे यांना अन्य कोणी वारस नसल्याचे प्रतिज्ञापत्र ही बनवले आहे.

तरी सदर सदनिकेच्या अनुषंगाने अन्य कोणी वारस असल्यास अथवा कुणाची हरकत असेल किंवा त्या वारसाहक्काच्या अनुषंगाने कोणत्या हरकती असतील अथवा सदर सदनिकेच्या अनुषंगाने कोणाचे कसले उदाहरणार्थ दान, तारण , गहाण, पोटगी इत्यादी किंवा त्यासंबंधी कुणाला काही लेखी म्हणणे सादर करायचे असेल तर ते कागदोपत्री पुराव्यांसह पुढील पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसाच्या आत सादर करावेत विहित मुदतीनंतर मिळालेल्या हरकती दाव्यांची दखल घेतली जाणार नाही तसेच सदर हक्क आपणहून स्वखुशीने सोडून दिले आहेत असे समजले जाईल व सदनिका हस्तांतरणाची कार्यवाही कायम करण्यात येईल. वर उल्लेख केलेल्या सदनिकेच्या अनुषंगाने काही संपर्क साधायचा असेल व काही हरकत घ्यायची असे तर त्यासाठी पुढे पत्ता दिला आहे. ही जाहीर नोटीस जनहितार्थ प्रसिद्ध केली.

सही /-
श्रीनिवास भा घैसास
वकील उच्च न्यायालय

# राज्यातील महायुती सरकार अनिल अंबानींवर मेहरबान?

**मुंबई - मुंबईतील सर्वात जुनी मेट्रो १ ही मार्गिका ताब्यात घेण्याची योजना महायुती सरकारनं थांबवली आहे. सार्वजनिक, खासगी भागीदारीतून तयार करण्यात आलेला हा एकमेव कॉरिडोर आहे. राज्य मंत्रिमंडळानं एमएमआरडीएच्या कार्यकारी समितीला मुंबई मेट्रो १ प्रायव्हेट लिमिटेड (MMOPL) च्या १७०० कोटी रुपयांच्या कर्जाच्या सेटलमेंटचं मूल्यांकन करण्याचे निर्देश दिले आहेत. मुंबई मेट्रो १ चा हा ११.४ किलोमीटर लांबीचा कॉरिडोर असून वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर या दरम्यान यावर दररोज ४.६ लाख प्रवासी प्रवास करतात. यामुळं अनिल अंबानींवर सरकारची मेहरबानी कशासाठी असा प्रश्न निर्माण झाला आहे.**

**राज्यातील महायुती सरकार अनिल अंबानींवर मेहरबानी करतंय का, असा प्रश्न निर्माण झालाय. कारण राज्य मंत्रिमंडळानं एमएमआरडीएच्या कार्यकारी समितीला मुंबई मेट्रो १ प्रायव्हेट लिमिटेडच्या १७०० कोटी रुपयांच्या कर्जाच्या सेटलमेंटचं मूल्यांकन करण्याचे निर्देश दिले आहेत.**




### सार्वजनिक-खासगी भागीदारातून प्रकल्प :

मुंबई मेट्रो १ मार्गिका ताब्यात घेण्याची योजना महायुतीच्या सरकारनं थांबवली असली तरी राज्य मंत्रिमंडळानं एमएमआरडीएच्या कार्यकारी समितीला मुंबई मेट्रो १ प्रायव्हेट लिमिटेड १७०० कोटी रुपयांच्या कर्जाचं सेटलमेंट करण्यासाठी मूल्यांकन करण्याचे निर्देश दिले गेले आहेत. २३५६ कोटी खर्च करुन बांधण्यात आलेला मेट्रो वन हा प्रकल्प तोट्यात नसला तरी आर्थिक संकटामध्ये सापडलेल्या उद्योगपती अनिल अंबानींना यामधून बाहेर पडायचे आहे, अशी माहिती अधिकाऱ्यांकडून मिळाली आहे. सार्वजनिक, खासगी भागीदारातून तयार करण्यात आलेल्या या प्रकल्पात एमएमआरडीएचा २६ टक्के हिस्सा, अनिल अंबानी यांच्या रिलायन्स इन्फ्राचा ७४ टक्के हिस्सा आहे. एमएमओपीएलनं मार्च २०२४ मध्ये त्यांच्या एकूण कर्जदारांची थकबाकी भरण्यासाठी एक करार केला होता. या करारानुसार एमएमओपीएलला एकूण १७०० कोटी रुपये द्यावे लागणार आहेत. या करारा अंतर्गत एमएमआरडीए आणि एमएमओपीएल यांनी बँकांना १७० कोटी रुपयांचं सुरुवातीचं पेमेंट सुद्धा केलं आहे.

### अनिल अंबानी यांना यातून बाहेर काढण्यासाठी :

एमएमआरडीएच्या कार्यकारी समितीनं अनिल अंबानी यांना १७०० कोटी रुपयांच्या कर्जाच्या सेटलमेंट करण्यासाठी मूल्यांकनाचे आदेश दिल्यानंतर रिलायन्स इन्फ्रा समभागांना गती मिळाली आहे. कंपनीचे शेअर हे १० टक्क्यांनी वधारले आहेत. या प्रकरणावर बोलताना बँकिंग क्षेत्रातील तज्ञ विश्वास उटगी म्हणाले, हा प्रकल्प तोट्यात नाही. कुठलाही मेट्रोचा प्रकल्प हा तोट्यामध्ये नाही. जेव्हा एखादा प्रकल्प तोट्यात दाखवला जातो त्यापूर्वी त्याचा नफा काढून घेतलेला असतो. एमएमआरडीए तोट्यात असताना सुद्धा दीड लाख कोटींचं प्रोजेक्ट ते हँडल करतात. एमएमआरडीएला चेहरा नाही, परंतु रिलायन्स इन्फ्राला अनिल अंबानी नावाचा चेहरा आहे. मुंबई मेट्रोसारखा प्रकल्प कधीही बंद करता येणार नाही. परंतु, आर्थिक संकटात सापडलेल्या अनिल अंबानी यांना यातून बाहेर काढण्यासाठी सरकारचा हा प्रयत्न आहे.

### महाराष्ट्र सरकारनं पैसे देण्यास दिला नकार :

राज्य मंत्रिमंडळानं ११ मार्च रोजी मेट्रो १ मधील रिलायन्स इन्फ्राचे ७४ टक्के स्टेक एमएमआरडीए कडून ४ हजार कोटी रुपयांना खरेदी करण्याची मंजुरी दिली होती. त्याचसोबत एमएमओपीएलला सुद्धा प्रकल्पातून बाहेर पडण्याची परवानगी दिली गेली. परंतु, हा करार पूर्ण करण्यासाठी एमएमआरडीएनं पैसे नसल्याचं कारण पुढं केलं आणि सरकारला पैसे देण्यास सांगितलं. परंतु, महाराष्ट्र सरकारनं सुद्धा पैसे देण्यास नकार दिला. राज्य मंत्रिमंडळानं सुद्धा एमएमओपीएल खरेदीचा निर्णय फिरवला. यानंतर आता एमएमआरडीएचे आयुक्त एमएमओपीएलच्या सर्व सहा कर्जदारासोबत बैठक घेण्याच्या तयारीत आहेत. तसंच एप्रिल २०२३ ते मार्च २०२४ या एक वर्षाच्या कालावधीत एमएमओपीएलनं २२५ कोटींचं अतिरिक्त कर्ज भरलं आहे.



श्री जगन्नाथ कल्चरल एज्युकेशन ट्रस्टच्या वतीने ठाण्यातील मनोरमानगर ते उपवन पालवादेवी मंदिर अशी श्री जगन्नाथ रथ यात्रा काढण्यात आली होती यामध्ये मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले होते.(छाया- मनोज सिंह)







मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना या योजनेचे अर्ज भरण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, ठाणे शहर (जिल्हा) च्या वतीने मध्यवर्ती कार्यालय, फ्लॉवर व्हॅली कॉम्प्लेक्स, विवियाना मॉल समोर, ठाणे (प.) येथे शनिवार दिनांक ६ जुलै आणि रविवार दिनांक ७ जुलै, २०२४ रोजी दोन शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. शनिवारी ९८२ अर्ज जमा तर रविवारी १२०० च्या वर अर्ज जमा होणार असल्याची माहिती प्रदेश प्रवक्ते, ठाणे व पालघर समन्वयक, ठाणे जिल्हाध्यक्ष आनंद परांजपे यांनी दिली.या शिबीरामध्ये पहिल्या दिवशी शनिवारी एकूण ९८२ माता-भगिनींचे अर्ज जमा करुन घेण्यात आले. त्यापैकी १३६ अर्ज ऑनलाईन अपलोड करुन त्यांना पावती देखिल देण्यात आली. रविवारी या शिबीराचा दुसरा दिवस आहे. यावेळी जवळ-जवळ १२०० च्या वर माता-भगिनींचे अर्ज जमा होतील अशी अपेक्षा असून पहिल्या दिवशी आणि दुसऱ्या दिवशी जमा करण्यात आलेले सर्व अर्ज पुढील ४-५ दिवसांमध्ये आमच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांमार्फत ऑनलाईन अपलोड केले जातील आणि ऑनलाईन अपलोड केलेल्या अर्जाची पावती संबंधीत माता-भगिनींना कार्यालयातून देण्यात येईल, अशी माहिती देऊन महायुती सरकारने सुरु केलेल्या या योजनेबद्दल सर्व माता-भगिनींनी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार देवेंद्रजी फडणवीस महिला व बालविकास मंत्री ना. आदितीताई तटकरे यांचे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे महाराष्ट्र प्रदेश प्रवक्ते तथा ठाणे जिल्हाध्यक्ष आनंद परांजपे यांनी विशेष आभार मानले. (छाया- मनोज सिंह)




शिवसेनेच्या वतीने प्रभाग क्र - १९ मधील ज्येष्ठ नागरिकांना मोफत छत्री वाटप व नवनिर्वाचित खासदार नरेश म्हस्के यांचा सत्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली माजी नगरसेवक विकास रेपाळे व वृक्ष प्राधिकरण समिती सदस्य नम्रता भोसले -जाधव यांच्या पुढाकाराने दरवर्षी प्रमाणे यंदाही शिवसेनेच्या वतीने ठाणे महापालिका प्रभाग क्र - १९ मधील ज्येष्ठ नागरिकांना मोफत छत्री वाटप करण्यात आले.तसेच यावेळी नवनिर्वाचित खासदार नरेश म्हस्केयांचा जाहीर सत्कार देखील करण्यात आले.या कार्यक्रमाला खासदार नरेश म्हस्के, माजी शिवसेना महिला आघाडी प्रमुख मीनाक्षी शिंदे,माजी नगरसेवक विकास रेपाळे, वृक्ष प्राधिकरण समिती सदस्य नम्रता भोसले -जाधव आदीसह प्रभाग क्र १९ मधील शिवसेनेचे पदाधिकारी यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते. (छाया- मनोज सिंह)

### ....'सफाई अपनाओ, बिमारी भगाओ'चा आरोग्यपूर्ण संदेश

**(पान १ वरून)** करावयाचे प्रतिबंधात्मक उपचार व घ्यावयाची काळजी या अनुषंगाने अभियानांतर्गत स्वच्छता व आरोग्य विषयक व्यापक जनजागृती केली जात आहे तसेच सखोल स्वच्छता मोहीमा राबवून, डासनाशक फवारणी करून, आरोग्य तपासणीवर भर देऊन रोगप्रतिबंधात्मक कार्यवाही केली जात आहे.

याकामी डॉक्टरांची भूमिका अतिशय महत्वाची असून त्यादृष्टीने हेल्थकॉन या डॉक्टरांच्या राष्ट्रीय संस्थेने पुढाकार घेऊन लेट्स सेलिब्रेट फिटनेस या संस्थेच्या सहयोगाने हेल्थकॉन हाफ मॅरेथॉन आयोजित केली होती. सकाळी ५.३० वा. २१ किमी अंतराच्या हाफ मॅरेथॉनला प्रारंभ झाला. त्यानंतर १० किमी. व ५ किमी. मॅरेथॉन घेण्यात आली. यामध्ये ५०० हून अधिक डॉक्टर्स उत्साहाने सहभागी झाले होते. विशेष म्हणजे या हाफ मॅरेथॉनमध्ये सहभागी होण्याकरिता दिल्लीसह इतर राज्यातून १५० हून अधिक डॉक्टर्स आले होते.

या हेल्थकॉन हाफ मॅरेथॉनमध्ये नवी मुंबईतील डॉक्टरांनी विविध पारितोषिके संपादन करीत उल्लेखनीय कामगिरी केली. यामध्ये डॉ. अनिता बजाज २१ कि.मी. अंतराच्या प्रथम क्रमांकाच्या विजेत्या ठरल्या. डॉ. चेतन सिंघल, डॉ.अमित घरत, डॉ. नचिकेत जाधव यांनी २१ किलोमीटरच्या मॅरेथॉन मध्ये पारितोषिके संपादन केली. तसेच दहा कि.मी. अंतराच्या मॅरेथॉनमध्ये डॉ. प्रवीण गायकवाड, डॉ. आरती गायकवाड, डॉ. वैशाली लोखंडे, डॉ. केतकी दवे यांनी पारितोषिके पटकावली.

हेल्थकॉन हाफ मॅरेथॉनमध्ये सहभागी होणाऱ्या सर्व धावपटू डॉक्टर्सना मेडल्स देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच प्रत्येक वयोगटातील विजेत्या पहिल्या ३ क्रमांकांच्या पुरूष व महिला धावपटूंना सन्मानचिन्हे प्रदान करून गौरविण्यात आले.

विशेष म्हणजे या ठिकाणी मान्यवरांच्या स्वागतासाठी पर्यावरण आणि आरोग्य या दोन्ही दृष्टीने उपयुक्त अशी फळांची करंडी स्नेहभेट म्हणून देण्यात आली.

'सफाई अपनाओ, बिमारी भगाओ' हे अभियान आरोग्याच्या दृष्टीने स्वच्छतेचे असलेले महत्व दर्शविणारे आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याची जपणूक करणारे डॉक्टर्सच स्वच्छतेचे महत्व सांगत हेल्थकॉन हाफ मॅरेथॉनमध्ये स्वच्छ सर्वेक्षणाचा संदेश प्रसारित करीत 'रन फॉर हेल्थ' म्हणत स्वत: धावले तेव्हा निश्चितच या उपक्रमाला नवा आयाम लाभलेला दिसून आला. हेल्थकॉन हाफ मॅरेथॉनव्दारे डॉक्टर्सच्या माध्यमातून स्वच्छतेचा व आरोग्य रक्षणाचा संदेश गांभीर्याने प्रसारित झाला.

### कोपरी शांती नगर भागात अद्यावत शौचालय

**(पान १ वरून)** उपशाखाप्रमुख अनिल भालेराव, उपशाखाप्रमुख अभिषेक इंगळे, उपशाखाप्रमुख योगेश नवगिरे, सुवर्णा फॅब्रोटेक प्रा. ली चे कु. वैभव मापारी, न्यू गावदेवी रिक्षा स्टँडचे अध्यक्ष शिवाजी बोबडे, अतुल महाडिक गट प्रमुख, अरविंद महाडिक युवासेना, सुरज माने युवासेना तसेच महिला आघाडीच्या सुषमा दिवेकर, भारती पाटील, ज्योती तावडे, संगीता राठोड,मीनाक्षी शिरसाठ, शर्मिला पवार, सुनीता गवळी आदी मान्यवर उपस्थित होते.

# पनवेल महानगरपालिकेच्यावतीने 'मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण' योजनेच्या अंमलबजावणी सुरुवात

**■ महानगरपालिका कार्यक्षेत्रात पाच ठिकाणी विशेष शिबिराचे आयोजन**

पनवेल - राज्य शासनाच्या महिला व बाल विकास विभागाच्या शासन निर्णयअन्वये मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण ही योजना सुरु करण्यात आलेली आहे. पनवेल महानगरपालिकेच्यावतीने या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी कार्यक्षेत्रात पाच ठिकाणी विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. महापालिका क्षेत्रातील जास्तीत जास्त पात्र भगिनींनी या योजनेचा लाभ असे आवाहन आयुक्त श्री. मंगेश चितळे यांनी केले आहे.



महानगरपालिका कार्यक्षेत्रात सदर योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने उपायुक्त बाबासाहेब राजळे यांच्या मार्गदर्शनाखाली नियोजन करण्यात आले आहे. जास्तीत जास्त लाभार्थी भगिनींनी सदर योजनेचा लाभ मिळण्याच्या दृष्टीने महानगरपालिकेच्यावतीने महिला बाल कल्याण विभागातर्फे पाच प्रभाग समिती निहाय विशेष शिबीर /कॅम्पचे नियोजन करण्यात आले आहे. हे विशेष शिबिर दिनांक ८,९ , १० जुलै २०२४ रोजी सकाळी १० ते ६ या वेळात घेतले जाणार आहेत. तसेच ११ जुलैपासून ३१ऑगस्टपर्यंत प्रत्येक प्रभाग कार्यालयात या योजनेंतर्गत अर्ज भरण्यात येणार नाही.

आजपासून प्रत्येक प्रभाग समिती मध्ये अंगणवाडी सेविका, महापालिकेचे कर्मचारी तसेचआरोग्य विभागामार्फत परिचारक असे एकुण १५० मदतनीस कार्यरत असणार आहेत. तसेच प्रत्येक प्रभाग समिती निहाय ५ ऑटो रिक्षाद्वारे योजनेसाठी लागणारी कागदपत्रे तसेच शिबिराची प्रसिद्धी करण्यात येत आहे.

आयुक्तांच्या सूचनेनुसार मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण योजनेच्या प्रचार व प्रसिद्धसाठी शहरातील विविध ठिकाणी होर्डिंग्ज व १०० ठिकाणी बॅनर्स लावण्यात आले आहेत. याचबरोबर दहा हजार पॅम्प्लेट्सचे वाटप करण्यात येत आहे. तसेच पथनाट्याद्वारेही प्रत्येक प्रभाग समिती मध्ये जनजागृती करण्यात येत आहे.

#### ■ कधी आणि कुठे....

**■ पाच ठिकाणी विशेष शिबिराची दिनांक ८,९ , १० जुलै २०२४ रोजी सकाळी १० ते ६ या वेळात घेतले जाणार आहेत.**

■ **पनवेल-** डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन आणि रोहिदास वडा समाज मंदिर

■ **खारघर -**खारघर प्रभाग समितीमध्ये टॅक्स ऑफिस, प्राईड सोसायटी( सेक्टर -७)कळंबोली प्रभाग समितीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन (रोडपाली)

■ **कामोठे-** प्रभाग समितीमध्ये कम्युनिटी हॉल, सेक्टर २१

■ **नावडे-** नावडे उपविभागामध्ये नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र



**प्रत्येक पात्र महिलेला तिच्या स्वत:च्या आधार लिंक केलेल्या सक्षम बँक खात्यात DBT द्वारे दरमहा रु. १५००/- इतकी रक्कम दिली जाईल.**

#### ■ योजनेचे लाभार्थी

महाराष्ट्र राज्यातील २१ ते ६५ या वर्ष वयोगटातील विवाहीत, विधवा, घटस्फोटीत, परित्यक्त्या आणि निराधार महिला तसेच त्या कुटुंबातील केवळ एक अविवाहित महिला.

#### पात्रता

१. महाराष्ट्र राज्याचे रहिवाशी असणे आवश्यक.
२. राज्यातील विवाहीत, विधवा, घटस्फोटीत, परित्यक्त्या आणि निराधार महिला तसेच त्या कुटुंबातील केवळ एक अविवाहित महिला.
३. किमान वयाची २१ वर्षे पूर्ण व कमाल वयाची ६५ वर्ष पूर्ण होईपर्यंत.
४. लाभार्थ्यांचे स्वतःचे आधार लिंक असलेले बँक खाते असणे आवश्यक.
५. लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु. २.५० लाखापेक्षा जास्त नसावे.

## राष्ट्रीय गृहनिर्माण बँक

■ जागा : ४८
■ पदाचे नाव तपशील:
१ जनरल मॅनेजर
२ असिस्टंट जनरल मॅनेजर
३ डेप्युटी मॅनेजर
४ असिस्टंट मॅनेजर
५ चीफ इकोनॉमिस्ट
६ सिनियर प्रोजेक्ट फायनान्स ऑफिसर
७ प्रोजेक्ट फायनान्स ऑफिसर
८ प्रोटोकॉल ऑफिसर
९ प्लिकेशन डेवलपर

■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: (i) कोणत्याही शाखेतील पदवी (ii) ICWAI/ ICAI/CFA/MBA (Finance) (iii) १५ वर्षे अनुभव
पद क्र.२: (i) कोणत्याही शाखेतील पदवी (ii) ICWAI/ ICAI/CFA/MBA (Finance) (iii) १० वर्षे अनुभव
पद क्र.३: (i) कोणत्याही शाखेतील पदवी (ii) ICWAI/ ICAI/CFA/MBA (Finance) (iii) ०२ वर्षे अनुभव
पद क्र.४: ६०% गुणांसह कोणत्याही शाखेतील पदवी SC/ST/PWD: ५५% गुण
पद क्र.५: (i) आर्थिक अर्थशास्त्र किंवा अर्थमिति या विषयातील विशेषीकरणासह अर्थशास्त्रात पदव्युत्तर पदवी. (iii) १५ वर्षे अनुभव
पद क्र.६: (i) कोणत्याही शाखेतील पदवी (ii) ICWAI/ ICAI/CFA/MBA (Finance) (iii) १५ वर्षे अनुभव
पद क्र.७: (i) कोणत्याही शाखेतील पदवी (ii) ICWAI/ ICAI/CFA/MBA (Finance) (iii) १० वर्षे अनुभव
पद क्र.८: (i) कोणत्याही शाखेतील पदवी (ii) उमेदवार हा भारतातील RBI/PSB/FI मधून निवृत्त अधिकारी असावा आणि वरिष्ठ व्यवस्थापन स्तरावर काम केले पाहिजे. भारतातील RBI/PSB/FIs मध्ये किमान २५ वर्षांचा अनुभव ज्यापैकी किमान ०५ वर्षांचा कामाचा अनुभव पब्लिक रिलेशन/प्रोटोकॉल ड्युटी क्षेत्रात असावा.
पद क्र.९: (i) B.E.(CS/IT)/B.Tech. (CS/IT)/ MCA/M.Tech (CS/IT)/B.Sc.(CS/IT)/ M.Sc. (CS/IT) (iii) ०२ वर्षे अनुभव

■ वयाची अट: ०१ जुलै २०२४ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
पद क्र.१: ६२ वर्षांपर्यंत
पद क्र.२: ४० ते ५५ वर्षे
पद क्र.३: ३२ ते ५० वर्षे
पद क्र.४: २३ ते ३२ वर्षे
पद क्र.५: २१ ते ३० वर्षे
पद क्र.६: ४० ते ५९ वर्षे
पद क्र.७: ३५ ते ५९ वर्षे
पद क्र.८: ५० ते ६२ वर्षे
पद क्र.९: २३ ते ३२ वर्षे
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC/EWS: 850/- SC/ST/ PWD: 175/-
■ महत्त्वाच्या तारखा:
Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: १९ जुलै २०२४
परीक्षा: नंतर कळविण्यात येईल.
■ अधिकृत वेबसाईट https://www.nhb.org.in/

## भंडारा ऑर्डनन्स फॅक्टरी

■ जागा : १५८
■ पदाचे नाव तपशील:
१ कार्यकाळ आधारित DBW (डेंजर बिल्डिंग वर्कर) १५८
■ शैक्षणिक पात्रता: AOCP ट्रेड (NCTVT) चे माजी प्रशिक्षणार्थी ज्यांना ऑर्डनन्स फॅक्टरी प्रशिक्षण / लष्करी दारूगोळा आणि स्फोटकांच्या निर्मिती आणि हाताळणीचा अनुभव आहे. आणि पूर्वीच्या आयुध निर्माणी मंडळाच्या आयुध कारखान्यांमध्ये प्रशिक्षण घेतलेले AOCP ट्रेडचे एक्स-ट्रेड अप्रेंटिस. किंवा NCTVT (आता NCVT) द्वारे जारी केलेले NAC/NTC प्रमाणपत्र असलेले उमेदवार आणि सरकारशी संलग्न असलेल्या सरकारी/खाजगी संस्थेकडून AOCP ट्रेडमध्ये आणि सरकारी ITI मधून AOCP असलेले उमेदवार विचारात घेतले जातील.
■ वयाची अट: १५ जुलै २०२४ रोजी १८ ते ३५ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण: भंडारा
■ फी : फी नाही.
■ अर्ज पाठविण्याचा पत्ता: The Chief General Manager, Ordnance Factory Bhandara District: Bhandara Maharashtra, Pin-441906
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: १५ जुलै २०२४
■ अधिकृत वेबसाइट https:// ddpdoo.gov.in/units/OFBA

## स्टाफ सिलेक्शन कमिशन

■ Total: १७७२७ जागा
■ परीक्षेचे नाव: SSC संयुक्त पदवीधर स्तर परीक्षा २०२४
■ पदाचे नाव तपशील:
१ असिस्टंट सेक्शन ऑफिसर
२ असिस्टंट/असिस्टंट सेक्शन ऑफिसर
३ इस्पेक्टर ऑफ इनकम टॅक्स
४ इन्स्पेक्टर
५ असिस्टंट एनफोर्समेंट ऑफिसर
६ सब इंस्पेक्टर
७ एक्झिक्युटिव असिस्टंट
८ रिसर्च असिस्टंट
९ डिविजनल अकाउंटेंट
१० सब इंस्पेक्टर (CBI)
११ सब इंस्पेक्टर/जुनियर इंटेलिजन्स ऑफिसर
१२ कनिष्ठ सांख्यिकी अधिकारी
१३ ऑडिटर
१४ अकाउंटेंट
१५ अकाउंटेंट /ज्युनियर अकाउंटेंट
१६ पोस्टल असिस्टंट / सॉर्टिंग असिस्टंट
१७ वरिष्ठ सचिवालय सहाय्यक / उच्च श्रेणी लिपिक
१८ सिनियर एडमिन असिस्टंट
१९ कर सहाय्यक
२० सब-इस्पेक्टर (NIA)
■ शैक्षणिक पात्रता:
कनिष्ठ सांख्यिकी अधिकारी: पदवी व १२वीत गणितामध्ये किमान ६०% गुण किंवा सांख्यिकीसह कोणत्याही विषयात पदवी.
■ उर्वरित पदे: कोणत्याही शाखेतील पदवी.
■ वयाची अट: ०१ ऑगस्ट २०२४ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
पद क्र.१: २० ते ३० वर्षे, १८ ते ३० वर्षे
पद क्र.२, ३, ४, ५, ६, ७, ८, ९, ११: १८ ते ३० वर्षे
पद क्र.१०: २० ते ३० वर्षे
पद क्र.१२: १८ ते ३२ वर्षे
पद क्र.१३ ते २०: १८ ते २७ वर्षे
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC: 100/- SC/ST/PWD
■ महत्त्वाच्या तारखा:
Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: २४ जुलै २०२४ (११:०० PM²)
Tier I परीक्षा: सप्टेंबर/ऑक्टोबर २०२४
Tier II परीक्षा: डिसेंबर २०२४
■ अधिकृत वेबसाईट https://ssc.gov.in/

## हिंदुस्तान कॉपर लिमिटेड

■ Total: ५६
■ पदाचे नाव तपशील:
ज्युनियर मॅनेजर माइनिंग
इलेक्ट्रिकल
कंपनी सेक्रेटरी
फायनान्स
HR
■ शैक्षणिक पात्रता: माइनिंग/इलेक्ट्रिकल डिप्लोमा + ०५ वर्षे अनुभव किंवा माइनिंग/ इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग पदवी+ ०२ वर्षे अनुभव किंवा पदवीधर+ ०५ वर्षे अनुभव/CA किंवा PG पदवी/ डिप्लोमा(Finance/HR) PG MBA (Finance/HR) + ०२ वर्षे अनुभव
■ वयाची अट: ०१ जून २०२४ रोजी १८ ते ४० वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण: कोलकाता
■ Fee: General/OBC/EWS: ५००/- SC/ST: फी नाही
■ महत्त्वाच्या तारखा:
Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: २१ जुलै २०२४
■ वेबसाईट https://www.hindustancopper.com/

# भातावर एक चमचा तूप घालून खाणे योग्य की अयोग्य?

### मधुमेही रुग्णांसाठी ठरेल का धोक्याची घंटा? लक्षात घ्या तज्ज्ञांचा सल्ला

आपल्यातील अनेक जणांना भात खाल्ल्याशिवाय जेवल्यासारखं वाटत नाही. पण, भातामुळे मधुमेह वाढेल या भीतीने जगभरातील मधुमेही रुग्णांना त्यांच्या नियमित आहारात भाताचा समावेश करण्यासंदर्भात सावधानतेचा इशारा दिला जातो. पण, जर आम्ही तुम्हाला सांगितले की, यातूनसुद्धा एक मार्ग निघू शकतो तर भातप्रेमींनो, आम्हाला यावर एक खास ट्रिक सापडली आहे; जी मधुमेहाचा सामना करण्यासाठी तुम्हाला मदत करू शकते. ही ट्रिक ऐकून आम्हीदेखील थक्क झालो. याबाबत अधिक जाणून घेण्यासाठी दी इंडियन एक्स्प्रेसने तज्ज्ञांशी संवाद साधला आणि ही ट्रिक कोणती, कशा पद्धतीने कार्य करेल, यादरम्यान कोणते तोटे उदभवू शकतात हे त्यांनी समजावून सांगितले आहे.

एमआरसी आणि पी. डी. हिंदुजा हॉस्पिटलच्या आहारतज्ज्ञ स्वीडल त्रिनिडेड म्हणाल्या, भातात तूप घातल्याने जेवणाचा ग्लायसेमिक इंडेक्स तात्त्विकदृष्ट्या सुधारतो; पण ग्लायसेमिक भार वाढतो. त्यांच्या मते, तुपात फॅटी सिडचे घटक असतात; जे कार्बोहायड्रेट्सचे पचन मंद करून, रक्तातील साखरेची पातळी कमी करते. तर भातात तूप मिसळल्याने त्याचा ग्लायसेमिक इंडेक्स कमी होऊ शकतो; ज्यामुळे तो उर्जेचा स्रोत ठरू शकतो.

तूप हा चरबीमध्ये विरघळणाऱ्या



ए, डी, ई व के या जीवनसत्त्वांनी समृद्ध आहे; जे भाताबरोबर खाल्लेल्या इतर पदार्थांमधील पोषक घटकांचे शोषण वाढवू शकते. तुपामध्ये Butyrate, एक शॉर्ट-चेन फॅटी सिडदेखील आहे; जे आतड्यांच्या आरोग्यासाठी फायदेशीर असते. निरोगी आतडे तुमचे चयापचय आरोग्य सुधारू शकते; ज्यामुळे अप्रत्यक्षपणे रक्तातील साखरेच्या व्यवस्थापनास फायदा होतो, असे बंजारा हिल्स, हैदराबाद येथील केअर हॉस्पिटलच्या क्लिनिकल डाएटीशियन सुषमा यांनी सांगितले आहे.

**या ट्रिकला सगळ्यांनी फॉलो करावे का?**

क्लिनिकल डाएटीशियन सुषमा म्हणाल्या की, हे सर्वांसाठी योग्य असू शकत नाही; विशेषतः ज्यांना अनियंत्रित मधुमेह आहे. तुपात चरबीचे प्रमाण जास्त असते; ज्यामुळे लोक उच्च कोलेस्ट्रॉल किंवा हृदयाच्या आरोग्याशी संबंधित समस्यांना बळी पडतात, असे स्वीडल त्रिनिडेड म्हणाले आहेत. भातात तूप घातल्याने कॅलरीजचे प्रमाण वाढते. मग संभाव्य वजन व्यवस्थापनात आणि तुमच्या कॅलरीज बर्न करण्यामध्येही अडथळे निर्माण होतात.

तसेच हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी समस्या असलेल्या लोकांनी सावधगिरी बाळगली पाहिजे कारण- तुपाचे जास्त सेवन त्यांच्या आरोग्यासाठी हानिकारक असू शकते. ज्या लोकांना दुग्धजन्य पदार्थांची लर्जी आहे, त्यांनी दक्षता घेणे आवश्यक आहे. कारण- तूप हा दुग्धजन्य पदार्थ आहे. तसेच भातात तूप घालण्याचे प्रमाणही ठरवले पाहिजे. एक मार्गदर्शक तत्त्व म्हणजे शिजवलेला भात ताटात वाढताना एक चमचा तूप घालणे (शिजविलेला भात सुमारे १/२ कप ) असे डाएशियन सुषमा म्हणाल्या आहेत.

तर, संतुलित आहार आणि नियमित व्यायामासाठी तूप हा पर्याय नाही हे लक्षात घेणे आवश्यक आहे. मधुमेहाचे व्यवस्थापन करण्यासाठी आणि तुमच्या आहारात तूप समाविष्ट करण्याबाबत आहारतज्ज्ञांचा सल्ला घ्या, असे आहारतज्ज्ञ स्वीडल म्हणाल्या आहेत.




# 'धर्मवीर २'चा टीझर प्रदर्शित

'धर्मवीर २' चित्रपटाची गेल्या काही दिवसांपासून जोरदार चर्चा चालू आहे. नुकताच या सिनेमाचा पोस्टर लॉन्च सोहळा पार पडला होता. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, निर्माते मंगेश देसाई, महाराष्ट्र भूषण अशोक सराफ, सचिन पिळगांवकर, महेश कोठारे, बॉलीवूड अभिनेता बॉबी देओल यांसारखे अनेक मान्यवर उपस्थित होते. ऑगस्ट क्रांती दिनाचं औचित्य साधत हा बहुचर्चित चित्रपट येत्या ९ ऑगस्टला प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या सिनेमाबद्दल प्रेक्षकांच्या मनात उत्सुकता निर्माण झालेली असतानाच नुकताच चित्रपटाचा पहिला टीझर प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे.

शिवसेनेचे दिवंगत ठाणे जिल्हाप्रमुख आनंद दिघे यांच्या जीवनावर आधारित 'धर्मवीर' चित्रपटाला प्रेक्षकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला होता. या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर जबरदस्त कमाई केली होती. प्रेक्षकांच्या या प्रतिसादानंतर काही महिन्यांपूर्वी 'धर्मवीर २' चित्रपटाची घोषणा निर्मात्यांकडून करण्यात आली होती. या चित्रपटाच्या पहिल्याच टीझरने सर्वांचं लक्ष वेधून घेतलं आहे. ज्यांच्या घरातली स्त्री दुःखी त्याची बरबादी नक्की टीझरमधील हा संवाद लक्षवेधी ठरतो.

चित्रपटाच्या ट्रेलरमध्ये दाखवल्यानुसार, आनंद दिघे यांच्याकडे एक मुस्लीम महिला रक्षाबंधनाच्या दिवशी राखी बांधायला येते. तेव्हा तिला चेहरा दाखवण्यास सांगितलं जातं. संबंधित महिलेने बुरखा बाजूला करून चेहरा दाखवताच तिला मारहाण झाल्याचं आनंद दिघे यांना समजतं. यावर ते संतापतात. बहिणीचं रक्षण करण्यासाठी राज्यभरातून आलेल्या सगळ्या स्त्रियांना घेऊन आनंद दिघे त्या महिलेच्या घरी जातात. यावेळी ज्यांच्या घरातली स्त्री दुःखी त्याची बरबादी नक्की असं सांगत ते संबंधित महिलेला मारहाण करणाऱ्याला चांगलाच धडा शिकवतात. असा अंगावर काटा आणणारा प्रसंग ट्रेलरमध्ये पाहायला मिळतो.

'धर्मवीर २' च्या या टीझरवर नेटकऱ्यांसह दिग्दर्शक रवी जाधव, स्वप्नील जोशी, सुबोध भावे, श्रुती मराठे या कलाकारांनी कौतुकाचा वर्षाव केला आहे. दरम्यान, 'धर्मवीर २'बद्दल सांगायचं झालं, तर या सिनेमाची निर्मिती अभिनेते मंगेश देसाई यांनी केली असून, दिग्दर्शनाची जबाबदारी प्रवीण तरडे यांनी सांभाळली आहे. यामध्ये अभिनेता प्रसाद ओक आनंद दिघे यांची, तर क्षितीश दातेने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भूमिका साकारली आहे.

## झिम्बाब्वेची विजयी सलामी

# विश्वविजेत्या इंडियाची 'यंग ब्रिगेड' पहिल्याच सामन्यात ठरली अपयशी

हरारे : भारत आणि झिम्बाब्वे यांच्यातील पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेतील पहिला सामना हरारे स्पोर्ट्स क्लब येथे खेळला गेला. या सामन्यात झिम्बाब्वे संघाने टी-२० विश्वचषक विजेत्या टीम इंडियाच्या यंग ब्रिगेडचा १३ धावांनी धुव्वा उडवला. या सामन्यातील पराभवामुळे टीम इंडिया या मालिकेत ०-१ ने पिछाडीवर पडली आहे. २०२४ मधील टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात भारतीय संघाचा हा पहिला पराभव होता. यापूर्वी भारताने सर्व मालिका आणि विश्वचषकातील सामने जिंकले होते. आता झिम्बाब्वेने भारताची सलग १२ सामन्यांची विजयी मालिका खंडीत केली आहे. तसेच भारताला झिम्बाब्वेविरुद्ध ८ वर्षानंतर पराभव पत्करावा लागला आहे. याआधी २०१६ साली भारतीय संघ पराभूत झाला होता.

दोन्ही संघांमध्ये खेळल्या गेलेल्या या सामन्यात टीम इंडियाचा कर्णधार शुबमन गिलने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. यानंतर झिम्बाब्वेने पहिल्या डावात फलंदाजी करताना २० षटकांत ९ गडी गमावून ११४ धावा केल्या. या काळात भारतीय गोलंदाजांची कामगिरी अप्रतिम होती. टीम इंडियाकडून रवी बिश्नोईने चार विकेट्स घेतल्या. त्याचबरोबर वॉशिंग्टन सुंदरने दोन, मुकेश कुमार आणि आवेश खानने प्रत्येकी एक विकेट घेतली.

सामन्याच्या दुसऱ्या डावात टीम इंडियासमोर विजयासाठी केवळ ११६ धावांचे लक्ष्य होते. जे भारतीय संघ अगदी सहज साध्य करण्याच्या इराद्याने मैदानात उतरले होते. मात्र, भारतीय संघाला हे लक्ष्य गाठता आले नाही आणि १९.५ षटकात १०२ धावांवर सर्वबाद झाला. या काळात कर्णधार गिल सर्वाधिक धावा करणारा फलंदाज ठरला. त्याने २९ चेंडूत ३१ धावा केल्या. याशिवाय वॉशिंग्टन सुंदरने २७ आणि आवेश खानने १२ चेंडूत १६ धावा केल्या. तरीही टीम इंडियाने शेवटच्या षटकात सामना गमावला.

टीम इंडियाला शेवटच्या षटकात झिम्बाब्वेविरुद्ध विजयासाठी ६ चेंडूत १६ धावांची गरज होती. भारताच्या ९ विकेट्सही पडल्या होत्या, पण वॉशिंग्टन सुंदर एका टोकाकडून फलंदाजी करत होता. तेव्हा भारत हा सामना जिंकू शकेल, अशी आशा निर्माण झाली होती. पण वॉशिंग्टनने सर्वांची निराशा केली आणि शेवटच्या षटकात केवळ दोन धावा काढता आल्या. यासह भारतीय संघाने झिम्बाब्वेविरुद्धच्या इतिहासातील फक्त तिसरा टी-२० सामना गमावला.



## आ. संजय केळकर यांच्यामार्फत मोफत वह्या वाटप






ठाणे : आमदार संजय केळकर यांच्या माध्यमातून व त्यांच्या हस्ते दरवर्षी प्रमाणे ह्या वर्षीही गरजू शालेय विद्यार्थ्यांना व स्लम परिसरात मोफत वह्या वाटप कार्यक्रम ठाण्यातील विविध ठिकाणी करण्यात आले.मानपाडा, आझाद नगर शाळा नंबर २, मनोरमा नगर, ढोकाळी, चंदनवाडी, नौपाडा, कोलबाड आदी विविध भागात वह्या वाटपाचा कार्यक्रम घेण्यात आला.

खूप खूप शिका, मोठे व्हा, आपल्या आई वडिलांचे स्वप्न पूर्ण करा. देशाचे चांगले नागरिक बना, शिक्षक हे गुरु च्या ठिकाणी आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी आपली वाटचाल केली पाहीजे असे मार्गदर्शन आ. केळकर यांनी विद्यार्थ्यांना केले.

युवा मोर्चाचे अध्यक्ष सुरज दळवी, दत्ता घाडगे, जितेंद्र मढवी, हेमंत म्हात्रे, संतोष साळुंखे, पंढरीनाथ पवार, शैलेश रेवाळे, सचिन शिनगारे आदीजणांनी या कार्यक्रमाचे आयोजन आप – आपल्या परिसरात व शाळेत केले होते.

### गायमुख ते फाऊंटन हॉटेल पर्यंत भुयारी मार्ग व फाऊंटन हॉटेल जक्शन ते भाइर्दर उन्नत मार्गाला मंजूरी

# घोडबंदर रोडवरील वाहतुकोंडी लवकरच फुटणार

### आ. प्रताप सरनाईक यांनी मुख्यमंत्री व एम.एम.आर.डी.ए. च्या आयुक्तांचे मानले आभार

ठाणे : घोडबंदर रोडवर होत असलेल्या वाहतुककोंडीवर उपाय योजना करण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार मंगळवार दि. २ जुलै, २०२४ रोजी एम.एम.आर. डी.ए. च्या प्राधिकरणाची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीमध्ये गायमुख ते फाऊंटन हॉटेल जक्शन पर्यंत भुयारी मार्ग व फाऊंटन हॉटेल जक्शन ते भाइर्दर उन्नत मार्ग या दोन्ही प्रकल्पांना मंजूरी देण्यात आली आहे.

*घोडबंदर रोडवरील गायमुख ते फाऊंटन हॉटेल जंक्शन या भागात चार पदरी मार्गिका असून या मागील ठाणे शहरातील घोडबंदर रस्त्याचा भाग व पुढील राष्ट्रीय महामार्गाचा भाग विस्तृत रूंदीचे आहेत. त्यामुळे गायमुख ते फाऊंटन हॉटेल जंक्शन या भागात मोठ्या प्रमाणावर वाहतुककोंडी होते. तसेच या रस्त्याचा काही भाग घाट स्वरूपातील असून या भागात अवजड वाहनांची वाहतुक देखील मोठ्या प्रमाणावर होत असल्याने वाहतुकीची गती धीमी असते. या समस्येवर उपाय योजना करण्यासाठी या रस्त्याच्या भागाचे रूंदीकरण करणे आवश्यक आहे तथापि, रस्त्याच्या एका बाजुला संजय गांधी राष्ट्रीय उद्यान व दुसर्या बाजुला ठाणे खाडी असल्याने रस्त्याचे रूंदीकरण करणे अश्यक्य आहे त्यामुळे गायमुख ते फाऊंटन हॉटेल जंक्शन या भागात भुयारी मार्ग होणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे भाइर्दर ते फाऊंटन हॉटेल जंक्शन या भागात देखील वाहतुककोंडी मोठ्या प्रमाणावर होत आहे. मुंबई महानगरपालिकेतर्फे वर्सोवा ते भाइर्दर या प्रकल्पाचे काम सुरू असल्याने भाइर्दर ते घोडबंदर रोडपर्यंत येण्याकरिता अंतर्गत रस्त्याचा वापर करण्यात येणार असून खाडी किनारा लगत असणारा खारफुटीचा भाग लक्षात घेता वाहतुककोंडीवर उपाय योजना करण्यासाठी भाइर्दर ते फाऊंटन हॉटेल जंक्शन पर्यंत उन्नत मार्ग होणे गरजेचे आहे.*

ठाणे शहरातून घोडबंदर मार्गे वसई, विरार, मिरा रोड तसेच ठाणे ते भाइर्दर येथे जाण्यासाठी नागरिकांना मोठ्या प्रमाणावर वाहतुककोंडीचा त्रास सहन करावा लागत आहे. घोडबंदर रोडवरील वाहतुककोंडी दुर करण्यासाठी गायमुख ते फाऊंटन हॉटेल जंक्शन या भागात भुयारी मार्ग बांधण्यात यावा तसेच भाइर्दर ते फाऊंटन हॉटेल जंक्शन पर्यंत उन्नत मार्गाची निर्मिती व्हावी यासाठी आमदार प्रताप सरनाईक हे गेल्या ७-८ वर्षांपासून शासनाकडे पाठपुरावा करीत होते. त्यांच्या पाठपुराव्याला यश येऊन मंगळवारी झालेल्या एम.एम.आर.डी.ए.च्या बैठकीमध्ये वसई, फाऊंटन हॉटेल जंक्शन ते गायमुख या भागात भुयारी मार्ग बांधण्यासाठी तसेच गायमुख ते वसई भुयारी मार्गाने येणाऱ्या वाहनांना पुढे मिरा रोड, भाइर्दरला अतिवेगाने जाता यावे यासाठी फाऊंटन हॉटेल जंक्शन, वसई ते भाइर्दरपर्यंत उन्नत मार्गाची निर्मिती करण्यासाठी एम.एम.आर.डी.ए.चे महानगर आयुक्त संजय मुखर्जी यांनी मंजुरी दिलेली आहे.

■ गायमुख ते फाऊंटन हॉटेल जंक्शन या भुयारी मार्गासाठी अंदाजे ११५०० कोटी रूपये व भाइर्दर ते फाऊंटन हॉटेल जंक्शन या उन्नत मार्गासाठी अंदाजे ८५०० कोटी असे दोन्ही प्रकल्पांना अंदाजे २० हजार कोटी खर्च अपेक्षित आहे. गायमुख ते फाऊंटन हॉटेल जंक्शन या भागात भुयारी मार्गाची निर्मिती करण्यात येणार असून गायमुख ते फाऊंटन हॉटेल या भागाची एकूण लांबी ५.५ किमी असून या अंतर्गत प्रत्येकी ३.५ किमी लांबीचे दोन स्वतंत्र बोगदे ३+३ असे सहा पदरी बांधण्यात येणार आहेत. तसेच भाइर्दर ते फाऊंटन हॉटेल जंक्शन पर्यंतच्या रस्त्याची एकूण लांबी १० किमी असून ४+४ असे आठ पदरी उन्नत मार्गाची निर्मिती करण्यात येणार आहे. त्यामुळे भविष्यात ठाण्यावरून वसई, विरार, मीरा रोड तसेच भाइर्दरकडे जाणार्या प्रवाश्यांची वाहतुककोंडीपासून सुटका होईल, असे आमदार श्री. प्रताप सरनाईक यांनी सांगितले.

■ या दोन्ही प्रकल्पांना एम.एम.आर.डी.ए.चे महानगर आयुक्त संजय मुखर्जी यांनी मंजुरी दिल्याबद्दल आमदार प्रताप सरनाईक यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब व एम.एम. आर.डी.ए.चे महानगर आयुक्त संजय मुखर्जी यांचे आभार मानले.

### प्रेस संपादक पत्रकार सेवा संघाच्या राज्य उपाध्यक्षपदी

## धर्माबाद भूमीपुत्र पी. जी. कोटूरवार यांची निवड

धर्माबाद : प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघाच्या राज्य उपाध्यक्षपदी धर्माबादचे भूमिपुत्र दैनिक प्राप्ती टाइम्सचे मुख्य संपादक पी. जी. कोटुरवार यांची निवड करण्यात आली आहे. दिल्ली येथील सद्या स्थायिक असलेले पी. जी. कोटुरवार हे दैनिक प्राप्ती टाइम्सचे मुख्य संपादक असून हे वर्तमान पत्र संपूर्ण महाराष्ट्रात लोकप्रिय रोखठोक वार्तांकन करत जनसामान्यांला न्याय देणेचे करत पत्रकारिता व दिल्ली, राजस्थान, हरियाणा, हिमाचल प्रदेश, मध्य प्रदेश व महाराष्ट्रत सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करीत असून त्यांना विविध पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. पी. जी. कोटुरवार संघाच्या नियमांचे अधीन राहून संघ बळकटीकरण व संघाची ध्येयधोरणे पूर्णत्वास नेण्यासाठी अधिक प्रयत्न करणार आहेत. त्यांच्या निवडीबद्दल संघाचे संस्थापक अध्यक्ष डी. टी. आंबेगावे, मंत्रालय व विधिमंडळ प्रमुख पंडित मोहिते- पाटील, राज्य महिला अध्यक्षा डॉ. सुधाताई कांबळे, राज्य सांस्कृतिक प्रमुख प्रशांत विलणकर, राज्य उपाध्यक्ष पंकज वानखेडे, विनायक सोळसे, महेश जाधव, विशाल पवार, राज्य सरचिटणीस संजीव भांबोरे, राजू जाधव, दशरथ अडसूळ, अशोक इंगवले, नवनाथ कापले, शमशुद्दीन शेख, राज्य कोषाध्यक्ष लक्ष्मण कांबळे, युवा राज्याध्यक्ष नितीन शिंदे, युवा कार्याध्यक्ष प्रशांत राजगुरू, विदर्भ अध्यक्ष केशव सवळकर, पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष शशिकांत पोरे, संपर्क प्रमुख जय कराडे, मराठवाडा महिला अध्यक्षा सुमती व्याहाळकर, कार्याध्यक्ष हुकूमत मुलाणी, संपर्क प्रमुख आनंद भालेराव, कोकण अध्यक्ष जयप्रकाश पवार, संपर्क प्रमुख संतोष वाव्हळ, कोकण महिलाध्यक्षा दीपिकाताई चिपळूणकर, कोकण संघटक श्रीराम कदम, कायदेविषयक सल्लागार ॲड. अमोल सकट, ॲड. रत्नाकर पाटील, ड.जितेंद्र पाटील, ड परेश जाधव, राज्य सल्लागार प्राचार्य डॉ. वसंत बिरादार, विठ्ठल शिंदे, नांदेड जिल्हाध्यक्ष संजीवकुमार गायकवाड, महाराष्ट्रातील सर्व जिल्हाध्यक्ष व तालुका पदाधिकारी यांच्या एक मताने दिनांक ३१ जुलै २०२६ पर्यंत ही निवड जाहीर करण्यात येत आहे.त्यांच्या निवडीचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.



## मुंब्र्याच्या डोंगरात पाच मुले वाट चुकली

ठाणे : मुंब्रा येथील डोंगरात शुक्रवारी सायंकाळी वाट चुकल्याने अडकलेल्या पाच मुलांची ठाणे आपत्ती व्यवस्थापन विभागासह मदत यंत्रणांनी सुखरुप सुटका करत त्यांना पालकांच्या ताब्यात दिले. ही मुले डोंगरात खेकडे पकडण्यासाठी गेली होती पण, तेथून परतत असताना ते वाट चुकल्याने सात तास डोंगरात अडकले होते.

असहदुल पिंटू शेख (१२), मोहम्मद पिंटू शेख (११), ईशान पिंटू शेख (१०), मुन्ना अमन शेख (०९) आणि अमीर बाबू शेख (११) अशी डोंगरातून सुटका झालेल्या पाच मुलांची नावे आहेत. यातील असहदुल, मोहम्मद आणि मुन्ना हे तिघे मुंब्र्यातील दर्गा गल्ली परिसरात राहतात. ईशान हा मुंब्र्यातील आझाद नगर तर अमीर हा कौसा पेट्रोल पंप जवळ राहतो. हे पाचजण शुक्रवारी सकाळी एका तरुणासोबत मुंब्रा येथील डोंगरात खेकडे पकडण्यासाठी गेले होते.

डोंगरावर तीनशे फुट उंच गेल्यानंतर ते खेकडे पकडू लागले. याचदरम्यान, त्यांच्यासोबत असलेला तरुण महत्वाचे काम असल्याचे सांगून त्यांना तिथेच सोडून निघून गेला. अंधार पडण्याआधी ही मुले डोंगरावरून खाली उतरू लागली. परंतु ते वाट चुकल्याने डोंगरात अडकले. तेथूनच ते मदतीसाठी आवाज देऊ लागले. दरम्यान, या डोंगराच्या पायथ्याशी एक दर्गा आहे. जंगलातील शांततेमुळे मुलांच्या मदतीचा आवाज दर्ग्यापर्यंत येत होता. यानंतर दर्ग्यातील नागरिकांनी माहिती देताच अग्निशमन दलाने घटनास्थळी धाव घेतली. अग्निशमन जवानांनी शुक्रवारी सायंकाळी ७.३० वाजल्यापासून या मुलांचे शोधकार्य सुरु होते. त्यापाठोपाठ ठाणे आपत्ती व्यवस्थापन विभाग, ठाणे आपत्ती प्रतिसाद दल आणि राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद पथक, गिर्यारोहकांच्या पथक आणि पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन मुलांचा शोध सुरू केला. अखेर पहाटे ३ वाजता पथकाने मुलांचा शोध घेऊन त्यांची सुखरुप सुटका करत त्यांना पालकांच्या ताब्यात दिले.

## डोंबिवली एमआयडीसीत शॉर्ट सर्किटमुळे डाईंग कंपनीला आग

डोंबिवलीत : डोंबिवली एमआयडीसीतील स्फोटाने बेचिराख झालेल्या अमुदान कंपनी शेजारी असलेल्या असलेल्या न्यूओ ऑर्गेनिक डाईंग कंपनीला रविवारी दुपारी अचानक शॉर्ट सर्किटमुळे आग लागली. आगीत डाईंगसाठी साठा करून ठेवण्यात आलेल्या पावडरच्या पिंपांना आग लागली. कंपनीतले कामगार आणि अग्निशमन दल तात्काळ घटनास्थळी पोहचल्याने आग तातडीने नियंत्रणात आणण्यात आली.

आगीच्या या घटनेत कोणतीही जीवित हानी झालेली नाही. डोंबिवली एमआयडीसीत पुन्हा स्फोट असे लघुसंदेश काही उतावीळ नेटकऱ्यांनी समाज माध्यमांवर व्हायरल केल्याने काही वेळ डोंबिवलीकरांच्या पोटात गोळाच आला होता. पण ही आग कंपनीतील स्फोटामुळे नाही तर ती शॉर्ट सर्किटमुळे लागली आहे. ती तातडीने नियंत्रणात आणली गेल्याची माहितीही अग्निशमन दलाने दिली आहे.

एमआयडीसी विभाग दोनमध्ये न्युओ ऑर्गेनिक डाईंग कंपनी आहे. कंपनीच्या बाहेरील महावितरणचा रोहित्रावर सकाळपासून दोन ते तीन वेळ शॉर्ट सर्किट झाले होत होते. त्यामुळे कंपनीतील वीज पुरवठा कमी जास्त होऊन, त्याचा परिणाम वीज दबाव कमी, जास्त होण्यावर होत होता. रविवारी दुपारी अशाच प्रकारे रोहित्रावर जोरदार आवाज होऊन त्याचा परिणाम कंपनीतील वीज दाब अचानक वाढला. त्यामुळे कंपनीत शॉर्ट सर्किट झाले. या उच्च दाबाने कंपनीतील वीज वाहक तारांनी तात्काळ पेट घेतला. ही आग वीज वाहिन्यांजवळ डाईंगसाठी आणलेल्या आणि साठा करून ठेवलेल्या पिंपांना लागताच पावडर असलेल्या पिंपांनी पेट घेतला. याठिकाणी काम करत असलेल्या कामगारांनी तातडीने प्रतिबंधक उपाय करून आगीवर नियंत्रण मिळविण्याचा प्रयत्न केला. तसंच अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी तात्काळ आगीवर नियंत्रण मिळविले.आगीत कोणतीही जीवित हानी झाली नाही, असे कल्याण अंबरनाथ मॅन्युफॅक्चरर्सचे असोसिएशनचे माजी अध्यक्ष देवेन सोनी यांनी स्पष्ट केलं.

### 'सफाई अपनाओ, बिमारी भगाओ' अभियानात

## रेल्वे स्टेशन, बस डेपो व वर्दळीच्या जागी सखोल स्वच्छता मोहीमा

नवी मुंबई : दररोज नियमितपणे करण्यात येणा-या स्वच्छतेप्रमाणेच काही दुर्लक्षित जागांची सफाईदेखील विशेष मोहीमेव्दारे करण्यात यावी अशा प्रकारच्या नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या सूचनांनुसार आठही विभागांमध्ये सखोल स्वच्छता मोहीमा राबविण्यात येत आहेत. यामध्ये नागरिकांना सहभागी करून घेऊन शहरात स्वच्छतेची चळवळ उभी करण्याचा महानगरपालिकेचा प्रयत्न आहे.

या अनुषंगाने अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार आणि घनकचरा व्यवस्थापनाचे उपआयुक्त डॉ. अजय गडदे व परिमंडळ २ चे उपआयुक्त डॉ. कैलास गायकवाड यांच्या नियंत्रणाखाली घणसोली विभागात विभाग अधिकारी तथा सहा. आयुक्त संजय तायडे यांच्या पुढाकाराने घणसोली रेल्वे स्टेशन व परिसरात विशेष सखोल स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

सखोल स्वच्छता मोहीमेंतर्गत विभाग अधिकारी तथा सहा. आयुक्त भरत धांडे यांच्या नियंत्रणाखाली तुर्भे येथील पेट्रोल पंपांवरील शौचालय सफाईची विशेष मोहीम स्वच्छता अधिकारी संजीव रोकडे यांनी स्वच्छता निरीक्षक व स्वच्छता मित्रांसह राबविली.

तसेच कोपरखैरणे विभागाचे सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी सुनिल काठोळे यांनी स्वच्छता अधिकारीराजूसिंग चव्हाण यांच्या नियंत्रणाखाली स्वच्छता मित्रांच्या सहयोगाने कौपरखैरणे बस डेपोमध्ये सखोल स्वच्छता मोहीम राबविली.







## तानसा नदीची पातळी वाढल्याने शेतीकामासाठी गेलेले नागरिक अडकले

वसई: वसई पूर्वेच्या सायवन चाळीस पाडा येथे तानसा नदीची पातळी वाढल्याने शेतीकामासाठी गेलेले १६ नागरिक अडकून पडले होते. रविवारी सकाळी ११ च्या सुमारास हा प्रकार घडला. एनडीआरएफ च्या पथकाने अडकून पडलेल्या नागरिकांची सुखरूप सुटका केली आहे. वसई पूर्वेच्या भागातून तानसा नदी गेली आहे. या नदीला लागूनच अनेक गाव पाडे आहेत.

सध्या पावसाळा सुरू असल्याचे पूर्वेच्या भागात शेतीच्या कामांनी जोर धरला आहे. रविवारी सायवन चाळीस पाडा येथील १६ शेतकरी नागरिक तानसा नदी ओलांडून शेती कामासाठी गेले होते. शेतामध्ये काम करत असताना सकाळी ११च्या सुमरास तानसा धरणातून पाणी आल्याने पाण्याची पातळी अचानकपणे वाढली. त्यामुळे १६ जण शेतात अडकून पडले होते. या घटनेची माहिती महसूल विभागाला स्थानिकांनी दिली. महसूल विभागाने तातडीने एनडीआरएफचे पथक व अग्निशमन दल यांना पाचारण करण्यात आले होते. बोटींच्या साहाय्याने अडकून पडलेल्या १६ जणांना सुखरूप बाहेर काढण्यात एनडीआरएफ व अग्निशमन दलाच्या जवानांना यश आले आहे. यात ८ पुरुष व ८ महिलांचा समावेश आहे.



## कशेळी खाडीत ठाणे पालिका कचऱ्याचा भराव?

ठाणे : ठाणे आणि भिवंडी शहराच्या वेशीवर असलेल्या कशेळी गावातील खाडीकिनारी भागात भराव टाकून अतिक्रमण करण्यात येत असतानाच, येथील काही भागात भरावासाठी ठाणे महापालिका क्षेत्रातून जमा होणारा कचरा आणून टाकला जात असल्याची बाब नारपोली पोलिसांच्या कारवाईतून पुढे आली आहे. पालिकेच्या ठेकेदाराकडून या कचऱ्याचा पुरवठा केला जात असून याप्रकरणी पालिका ठेकेदारासह डम्परचालकांवर नारपोली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यात कुणालाही अटक करण्यात आलेली नाही.

भिवंडी तालुक्यात कशेळी गाव येते. हे गाव ठाणे आणि भिवंडीच्या वेशीवर आहे. ठाणे आणि कशेळी गावाला लागूनच खाडी किनारा आहे. या खाडी किनारी भागात दोन्ही बाजुला गेल्या काही वर्षांपासून अतिक्रमण वाढले आहे. खाडी किनारी भागातील खारफुटीवर भराव टाकून कांदळवन नष्ट केले जात असून याबाबतच्या तक्रारी सातत्याने पुढे येत आहे. खाडी किनारी भागात रात्रीच्या वेळेस मातीचा आणि कचऱ्याचा भराव टाकला जात असल्याच्या तक्रारी होत्या. परंतु त्यावर फारशी कारवाई होताना दिसून येत नव्हती. दरम्यान, नारपोली पोलिसांनी केलेल्या कारवाईतून खाडी किनारी भागात बेकायदा भराव होत असून त्यासाठी ठाणे महापालिकेचा ठेकेदार अनिल शर्मा हा कचऱ्याचा पुरवठा करत असल्याचे उघडकीस आले आहे.

नारपोली पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरिक्षक बढे आणि पोलिस शिपाई स्वप्नील जाधव हे शुक्रवारी रात्री गस्तीवर होते. त्यावेळेस कशेळी पाईप लाईन मार्गे हायवे दिवा येथे जात असताना, त्यांना खाडी किनारी भागात डम्परद्वारे कचरा टाकून तो जेसीबीद्वारे पसरविला जात असल्याचे निर्दशनास आले. या कचऱ्यामुळे परिररातील नागरी वस्त्यांमध्ये दुर्गंधीबरोबरच रोगराई पसरण्याची शक्यता असल्याने बढे आणि जाधव यांनी त्याठिकाणी कचऱ्याचे डम्पर खाली करून घेत असलेल्या यश पाटील आणि विकास सदाशिव पाटील यांच्याकडे विचारणा केली. सुरुवातीला त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली पण, पोलिसांनी कचरा टाकण्याच्या परवानगीबाबत विचारणा करताच त्यांनी याबाबत माहित नसल्याचे सांगितले. तसेच हा कचरा ठाणे महापालिकेचा असून पालिकेचा ठेकेदार अनिल शर्मा हा कचरा पाठवतो, असे त्यांनी पोलिसांना सांगितले. याप्रकरणी नारपोली पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरिक्षक भरत कामत यांच्या आदेशावरून पोलिस शिपाई जाधव यांनी दिलेल्या तक्रारवरून याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## मोरबे धरणातही यंदाच्या पावसाळ्यातील सर्वाधिक पाऊस

### एका दिवसात १२३ मिलिमीटर पावसाची नोंद

नवी मुंबई: नवी मुंबई शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या मोरबे धरण परिसरातही यंदा पावसाने ओढ दिल्यामुळे शहरावर पाणी कपातीचे संकट ओढवले आहे. यंदाच्या पावसाळ्यात मोरबे धरण परिसरात ९ जूनला पावसाला सुरुवात झाली. आतापर्यंत मोरबे धरणात एकूण ७७४.६० मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे . यंदाच्या पावसाळ्यात पावसाने ओढ दिल्यामुळे नवी मुंबईकरांचे डोळे पावसाकडे लागलेले आहेत. धरण परिसरात थोड्याफार प्रमाणात पाऊस पडत असला तरी अजूनही पावसाचा जोर कमीच आहे. परंतु मागील २४ तासांत रविवारी सकाळी साडेआठ वाजेपर्यंत एका दिवसात १२३ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. यापूर्वी २० जूनला ११७.४० मिलिमीटर पावसाची नोंद झाली होती.

यंदाच्या पावसाळ्यात ७७४.६० मिलिमीटर पावसाची नोंद झाली असली तरी गेल्या वर्षीच्या तुलनेत धरणात पाणीसाठा कमी आहे. गेल्या वर्षी आजच्या दिवशी धरणात ३२.६०% पाणीसाठा होता तर आज धरणात ३१.०८ % पाणी साठा शिल्लक आहे. त्यामुळे नागरिकांनी पाण्याचा वापर जपून करावा असे आवाहन नवी मुंबई महापालिकेतर्फे करण्यात येत आहे तर नागरिकांना जोरदार पावसाकडे डोळे लागले आहेत.

### दिघा व ऐरोली विभागात विद्यार्थी आणि आरोग्य कर्मचाऱ्यांसह

## 'सफाई अपनाओ, बिमारी भगाओ' अभियानाचे यशस्वी आयोजन

नवी मुंबई : केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार 'स्वच्छ सर्वेक्षण २०२४' अंतर्गत 'सफाई अपनाओ - बिमारी भगाओ' हे विशेष अभियान राबविण्यात येत असून यामध्ये आरोग्याचा आणि स्वच्छतेचा परस्पर संबंध लक्षात घेत विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत.

नवी मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली या अभियानांतर्गत लोकसहभागावर भर देत सर्वच विभागांमध्ये स्वच्छता मोहीमा, जनजागृती तसेच कार्यक्रमांचे आयोजन केले जात आहे. अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार आणि घनकचरा व्यवस्थापनाचे उपआयुक्त डॉ. अजय गडदे यांच्या नियंत्रणाखाली दोन्ही परिमंडळांचे उपआयुक्त श्री. सोमनाथ पोटरे व डॉ. कैलास गायकवाड यांच्या नियंत्रणाखाली हे उपक्रम राबविले जात आहे.

बेलापूर विभागात करावेगाव ते सिवूड नेक्सस मॉलपर्यंत काढण्यात आलेल्या भव्यतम स्वच्छता दिंडी प्रमाणेच विविध समाज घटकांना व विशेषत्वाने शहराचे भविष्य असणाऱ्या विद्यार्थ्यांना सहभागी करून वॉर्ड पातळीवरही अनेक उपक्रम राबविले जात आहेत.

अशाच प्रकारचा एक अभिनव स्वच्छता उपक्रम दिघा शाळा क्र. १०८ येथील विद्यार्थ्यांसह परिमंडळ २ चे उपआयुक्त तथा दिघा विभाग अधिकारी डॉ. कैलास गायकवाड यांच्या माध्यमातून स्वच्छता अधिकारी श्री.विजय पडघन व विभागातील अधिकारी, कर्मचारी, स्वच्छतामित्र यांनी राबविला. यावेळी परिसर स्वच्छता करण्यात आली तसेच स्वच्छता, प्लास्टिक प्रतिबंध व माझी वसुंधरा अभियान अंतर्गत पर्यावरण संरक्षण, संवर्धनाची शपथ घेण्यात आली.

ऐरोली विभागातही नमुंमपा शाळा क्र. ५३ चिंचपाडा येथे 'सफाई अपनाओ - बिमारी भगाओ' अभियानांतर्गत विद्यार्थ्यांचे प्रबोधन करण्यात आले व त्यांना आपल्या घरापासूनच कचरा व्यवस्थापनाची सुरूवात करण्याचे सांगण्यात आले. यावेळी शाळेतील अंतर्गत व बाह्य भागात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. त्याचप्रमाणे ड्राय वेस्ट बँक सारखा प्लास्टिकला हद्दपार करणारा उपक्रम अधिक जोमाने राबविण्यास सांगण्यात आले.

शाळेच्या बाजूलाच असलेल्या प्राथमिक नागरी आरोग्य केंद्रातही 'सफाई अपनाओ - बिमारी भगाओ' अभियानाचे महत्व सांगण्यात आले. यामध्ये नागरिकांशी थेट संपर्क असणाऱ्या आशा वर्करची जनजागृतीमधील महत्वाची भूमिका त्यांना पटवून देण्यात आली तसेच मोहीम प्रभावीपणे राबविण्यासाठी संपूर्ण क्षमतेने काम करण्यासाठी प्रोत्साहीत करण्यात आले. ऐरोली विभागाचे सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी अशोक अहिरे तसेच उप मुख्य स्वच्छता अधिकारी राजेंद्र इंगळे यांनी आपले विभागातील सहकारी, स्वच्छतामित्र तसेच शाळेचे मुख्याध्यापक - शिक्षक आणि नागरी आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. सुषमा सरकुटे, आशा वर्कर, मलेरिया फवारणी कामगार यांच्या सहयोगाने हा उपक्रम यशस्वीरित्या राबविला.




## ८० वर्ष जुन्या इमारतीचा भाग कोसळला

ठाणे : ठाण्यातील जांभळीनाका बाजारपेठेतील ८० ते ९० वर्ष जुन्या इमारतीचा भाग रविवारी कोसळला. ही इमारत रिकामी असल्याने दुर्घटना टळली. सुरक्षेच्या कारणास्तव आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचाऱ्यांनी इमारतीजवळ धोकापट्टी बांधली आहे. जांभळीनाका येथील कडवा गल्ली परिसरात ८० ते ९० वर्ष जुनी अतिधोकादायक दुमजली इमारत आहे. या इमारत कोणीही वास्तव्यास नव्हते. रविवारी सकाळी १०.३० वाजताच्या सुमारास इमारतीचा जीर्ण झालेला भाग अचानक कोसळला. घटनेची माहिती ठाणे महापालिकेला मिळाल्यानंतर आपत्ती व्यवस्थापन विभागाचे पथक घटनास्थळी दाखल झाले. सुरक्षेच्या कारणास्तव पथकांनी येथे धोकापट्टी बांधली आहे.

'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर - डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई - ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम - ४००६०१ (महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक - चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१